# डॉ . मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू .एस . कला आणि वाणिज्य महाविद्यालय नागपूर

## सांस्कृतिक विभाग अहवाल 2020-21











सादरकर्ते

डॉ . मनीषा नागपुरे   (सांस्कृतिक विभाग प्रमुख)

डॉ . मधुकरराव वासनिक पी . डब्ल्यू .एस कला आणि वाणिज्य

महाविद्यालय कामठी रोड, नागपूर

# **सांस्कृतिक विभाग कार्यान्वयन समिती 2020 -2021**

शैक्षणिक सत्र 2020- 2021 या वर्षाकरीता खालीलप्रमाणे सांस्कृतिक समितीचे गठन करण्यात आले

डॉ . मनीषा नागपुरे ( सांस्कृतिक विभाग प्रमुख)

१) प्रा.डॉ. नरेन्द्र बागडे ( मार्गदर्शक सल्लागार )

२) प्रा डॉ. विमल राठोड ( सदस्य )

३) चंद्रशेखर पाटील ( सदस्य )

४) डॉ. विवेक चव्हाण ( सदस्य )

५) प्रा . अमृता डोरलीकर ( सदस्य )

६) डॉ. मेघा रामटेके ( सदस्य )

७) डॉ कमलाकर तागडे (सदस्य )

# Culture Department Activity Report of Session 2020-2021

## 1) Online Guest Lecture Series on Dr. Babasaheb Aambedkar Mahaprinirwan Din -

डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू . एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड , नागपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने ६ डिसेंबर 2020 ला online( आभासी) पद्धतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते या व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प प्रसिद्ध साहित्यिक आणि आंबेडकरी विचारवंत, मुंबई विद्यापीठाचे इंग्रजी विषयाचे माजी विभागप्रमुख डॉ. रंगराव भोगले ( बी. रंगराव) हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा लिखित " जातिव्यवस्थेचे निर्मूलन "या ग्रंथाचे आजच्या परिस्थितीत महत्त्व या विषयाच्या अनुषंगाने दिनांक ०६ डिसेंबरला रविवारी सकाळी १०.००वाजता गुंफले तर दिनांक ७ डिसेंबरला सकाळी १०.०० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील पाली प्राकृत विभागाचे प्रोफेसर आणि विभाग प्रमुख डॉ.महेश देवकर हे "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली बुद्ध चरित्राची मांडणी" या विषयाच्या अनुषंगाने दुसरे पुष्प गुंफले . या दोनही दिवसाच्या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी पिपल्स वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मधुकररावजी वासनिक हे होते. दिनांक ०८ डिसेंबरला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व ग्रिनीज बुक रेकॉर्ड प्राप्त माननीय प्रवीण भिवगडे यांचा 'भिमस्वरांजली' चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .






प्रसिद्ध साहित्यिक आणि आंबेडकरी विचारवंत, मुंबई विद्यापीठाचे इंग्रजी विषयाचे माजी विभागप्रमुख डॉ. रंगराव भोगले ( बी. रंगराव) online( (आभासी पद्धतीने ) व्याख्यान  दिनांक  06 डिसेंबर  2020




"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली बुद्ध चरित्राची मांडणी" या विषयाच्या अनुषंगाने online( (आभासी पद्धतीने ) व्याख्यान  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील पाली प्राकृत विभागाचे प्रोफेसर आणि विभाग प्रमुख डॉ.महेश देवकर  दिनांक  07 डिसेंबर  2020




ग्रिनीज बुक रेकॉर्ड प्राप्त माननीय प्रवीण भिवगडे यांचा 'भिमस्वरांजली कार्यक्रम    08  डिसेंबर 2020

## Online State Level  Eassy Competition Subject –“Relevance of Dr. Babasaheb Ambedkar’s Thoughts on Democracy in the Present Context’’

डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू . एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड , नागपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त 6 डिसेंबर 2020 मध्ये  राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली होती निबंधाचा विषय -  डॉ. "बाबासाहेब आंबेडकरांचे  लोकशाही विषयक विचार आणि त्याची वर्तमानकालीन समर्पकता "  हा असून प्रथम पारितोषिक  3000/- द्वितीय पारितोषिक 2000/- व तृतीय पारितोषिक 1000/- असे ठेवण्यात आले होते. करोना काळातील अनेक अडचणींमुळे  आम्ही निबंध स्पर्धा online( आभासी) पद्धतीने आयोजित केली होती

या निबंध स्पर्धेत महाराष्ट्रातील  एकूण 60 निबंध स्पर्धकांनी सहभाग घेतला होता या निबंधाचे मूल्यांकन  करतांना १)विषयाची मांडणी २) विषयसंबधित ज्ञान ३) विषयाचे विश्लेषण ४) भाषाशैली ५) कलात्मकता या पाच मुद्यांच्या आधारे निबंधाचे मूल्यमापन करण्यात आले व त्यानुसार गुणक्रमांक देण्यात आले त्यात

प्रथम पारितोषिक हे संयुक्तपणे  दोन विद्यार्थ्यांना देण्यात आले यात कु. साक्षी सरोदे (  श्री.ल. रा . तो वाणिज्य महा. अकोला) या विद्यार्थीनीला मिळाले तर दुसरे श्री. अभिषेक पाटील ( म.वा पी.डब्ल्यू एस महा नागपूर) या विद्यार्थ्याला   मिळाले. द्वितीय पारितोषिक सुद्धा सारख्या गुंणाक नामुळे  संयुक्तपणे देण्यात आले यात कु. निकिता रामटेके ( वसंतराव नाईक शासकीय संस्था आणि कला वाणिज्य महा . नागपूर)   व श्री सागर गांगुर्डे ( बी.पी. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स नागपूर)  या विद्यार्थ्याला मिळाले तृतीय पारितोषिक श्री प्रफुल गवई ( डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेज दिक्षाभूमी नागपूर) व कु . दर्शना सहारे ( मनोहरभाई पटेल वाणिज्य महा. आमगाव ता. देवरी) या विद्यार्थीनीने पटकाविले





D:/YP(2020)_LETTER (11 NOV).p65

Ph.: 2653711

**DR. MADHUKARRAO WASNIK**
**P.W.S. ARTS & COMMERCE COLLEGE**
REACCREDITED 'B' + BY NAAC (Third Cycle)
KAMPTEE ROAD, NAGPUR - 440 026
Website : www.pwscollege.edu.in Email: principalpws@yahoo.in / principal@pwscollege.edu.in

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त
## सांस्कृतिक विभागाद्वारा
## आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन ऑनलाईन निबंध स्पर्धा-२०२०

विषयः डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार आणि त्याची वर्तमानकालीन समर्पकता
डॉ.बाबासाहेब अम्बेडकर के लोकतंत्र के संदर्भ में विचार और वर्तमान परिप्रेक्ष में उसकी उपयोगिता
**"Relevance of Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts on Democracy in the Present Context"**

| प्रथम पुरस्कार | द्वितीय पुरस्कार | तृतीय पुरस्कार |
|---|---|---|
| रु.३,०००/- व प्रमाणपत्र | रु.२,०००/- व प्रमाणपत्र | रु.१,०००/- व प्रमाणपत्र |

### नियम व अटी :

१) निबंध स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी आपला निबंध स्वहस्ताक्षरात किंवा टंकलिखित करुन फक्त पीडीएफ (**PDF**) फाईल दिनांक २० डिसेंबर २०२० पर्यंत स्वतःचे नाव, वर्ग, महाविद्यालयाचे नाव, विद्यापीठाचे नांव, स्वतःचा पत्ता, स्वतःचा मोबाईल नंबर, ई-मेल सह **pwsperspectives @gmail.com** या महाविद्यालयाच्या ई-मेल वर पाठवावे.
२) कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतील.
३) निबंधाची शब्दमर्यादा १५०० ते २००० शब्दाची राहील.
४) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी व इंग्रजी राहील.
५) स्पर्धेचा निकाल महाविद्यालयाच्या वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल.
६) सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाईल.
७) निबंधाचे परिच्छेद इंटरनेट वरुन घेतलेले नसावे, असे निबंध **plagiarism** ओळखून स्पर्धेतून बाद केले जातील.

विद्यार्थ्यांनी स्पर्धेसंबंधी कोणतीही माहिती आवश्यक असल्यास खालील प्राध्याकांच्या व्हॉटसॲप नंबरवर संपर्क करावा. (डॉ.मनीषा नागपुरे-९८२३१५३००२, डॉ.सुदेश भोवते- ९८२३४१९३८९, डॉ.सुमेध नागदिवे-९९२१२८६०७१, श्री.सिध्दार्थ वाणी-८६९८८२४९६६, डॉ.महेंद्र गायकवाड-९०११९९६४४९, श्री. किशोर वरभे-९९२१२१३२२५, श्रीमती गामीणी मेश्राम-९८५०३००८८०)

संयोजक
(डॉ. मनीषा नागपुरे)
सांस्कृतिक विभाग प्रमुख

आयोजक
(डॉ. यशवंत पाटील)
प्राचार्य

---

**DR. MADHUKARRAO WASNIK**
**P.W.S. ARTS, COMMERCE &**
**SCIENCE COLLEGE, NAGPUR**



**Dr. Babasaheb Ambedkar Memorial**

*QUIZ, POSTER & ESSAY COMPETITION*

# *Certificate of Excellence*

*This is to certify that Ms/Mr ______________________________*
*a student of ______________________________ has*
*participated and stood __________ position in Quiz/Poster/Essay Competition*
*conducted during the year 2021.*

*CONVENOR*
Dr. Manisha Nagpure
(Cultural Committee)

*PRINCIPAL*
Dr. Yeshwant Patil

## Online National Webinar

## On the Occasion of Savitree Bai Fule Birth Annivarsary Organized One Day Interdiciplanry National Webinar On Status of Women in Higher Education in India: Redefining Roles Date - 04/01/202

डॉ . मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू .एस कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये 3 जानेवारी 2021 ला सावित्रीबाई फुले जयंती सांस्कृतिक विभाग महिला सेल आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली याप्रसंगी आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते वेबिनारचा विषय हा "उच्च शिक्षणात महिलांचे स्थान आणि तिची भूमिका " हा होता यावर पहिल्या सत्रात दिल्ली येथील इंदिरा गांधी मुक्त विश्वविद्यालय येथील प्रोफेसर डॉ. विमल थोरात यांनी उच्च शिक्षणात महिलांची दशा आणि दिशा यावर भाष्य केले तर दुसऱ्या सत्रात मुंबई येथील डॉ. जयश्री दखने यांनी महिलांच्या अनेक भूमिकांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले . तसेच या दिवसाचे औचित्य साधून संस्थेकडून महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या स्त्रीचा सन्मान आणि सत्कार करून तिच्या कार्याला पुरस्कृत करण्याकरता जीवन गौरव पुरस्कार सुरू करण्यात आला या वर्षीचा हा पुरस्कार सामाजिक ,शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या डॉ. कुमुदताई पावडे यांना मिळाला या राष्ट्रीय वेबिनारच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य यशवंत पाटील हे होते प्रमुख अतिथी संस्थेचे सचिव डॉ.मोहनजी वासनिक हे होते कार्यक्रमाचे संचालन प्रज्ञा बागडे यांनी केले तर प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ . मनीषा नागपुरे यांनी केले आभार प्रा. विमल राठोड यांनी मानले



**वेबिनारचा उद्देश** महिलांनी उच्च शिक्षणासाठी पुढे येण्याची गरज आहे आणि त्याचबरोबर तिला स्वतःच्या विकासासाठी जागा दिली पाहिजे. म्हणूनच तिच्या उच्च शिक्षणामध्ये कुटुंब आणि समाजाची भूमिका अपार आहे. स्त्रियांच्या शिक्षणास ते मिळवण्यासाठी मर्यादित ठेवू नये परंतु याचा उपयोग समाज आणि देशाच्या अर्थव्यवस्थेस समर्थन देण्यासाठी केला पाहिजे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी तिचा सहभाग सर्वांगीण विद्याशाख्यांमधून झाला पाहिजे. दुर्दैवाने उच्च शिक्षणात महिलांची टक्केवारी अल्प आहे. दुसरीकडे, ज्या स्त्रिया त्या पातळीवर पोहोचू शकल्या आहेत त्यांना समानतेचा आनंद घेण्यासाठी आणि व्यवस्थेत टिकून राहण्यासाठी प्रचंड आव्हाने आहेत. म्हणूनच, हे राष्ट्रीय वेबिनार उच्च शिक्षणातील महिलांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आयोजित केले गेले आहे,





"उच्च शिक्षणात महिलांचे स्थान आणि तिची भूमिका " आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन

**Date - 04/01/2022** राष्ट्रीय वेबीनार मध्ये मार्गदर्शन करताना डॉ. कुमुदताई पावडे



जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार व सत्कार स्वीकारताना
डॉ. कुमुदताई पावडे



Dr. Madhukarrao Wasnik P.W.S. Arts and Commerce College
Accredited 'B+' by NAAC
Kamptee Road, Nagpur-26
Women's Cell, Cultural Committee &
Department of Library

Esth:1968

Krantijyoti Savitribai Phule

Presents this
**Certificate of Participation**
to
*Dr Manisha Nagpure*
*of DMWPWS Arts Commerce College Kamptee Road Nagpur*
*for his/her active and invaluable participation during the conduct of National Webinar on*
*"Status of Women in Higher Education in India: Redefining Roles"*
*held on Monday, 4th January 2021 via zoom and YouTube on the occasion of*
*Krantijyoti Savitribai Phule birth Anniversary.*

| Dr. Yeshwant Patil<br>Principal &<br>Organiser | Dr. Pradnya Bagade<br>HoD Economics &<br>Convener Women's Cell | Dr. Manisha Nagpure<br>HoD Marathi &<br>Convener Cultural Committee | Mr. Siddharth Wani<br>Librarian &<br>Webinar Convener |
|---|---|---|---|



लोकमत समाचार

# सावित्रीबाई फुले से प्रेरणा लें महिलाएं

पीडब्ल्यूएस कॉलेज में आयोजित व्याख्यानमाला में उपस्थित अतिथि.

## पीडब्ल्यूएस कॉलेज में राष्ट्रीय व्याख्यानमाला में दखने का कथन

नागपुर | 5 जनवरी | लोस सेवा

शिक्षाविद् डॉ. जयश्री दखने का मानना है कि क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले ने महिला शिक्षा को बढ़ावा दिया. उन्होंने महिलाओं को शिक्षा हासिल करने के लिए प्रोत्साहित किया. मौजूदा पीढ़ी की महिलाओं को उनसे प्रेरणा लेनी चाहिए.

डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कॉलेज में सावित्रीबाई फुले जयंती के अवसर पर एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय व्याख्यानमाला का आयोजन किया गया. समारोह में प्रमुख वक्ता के रूप में डॉ. जयश्री दखने उपस्थित थीं. उन्होंने कहा कि आज भी उच्च शिक्षा के क्षेत्र में महिलाओं की संख्या बेहद कम है. इसके पीछे कई तरह के कारण हैं. महिलाओं को उच्च शिक्षा हासिल करने में आने वाली बाधाओं को खुद ही दूर करना होगा. अपने साथ ही दूसरी अन्य महिलाओं को उच्च शिक्षा हासिल करने के लिए प्रोत्साहित करना होगा. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय की हिंदी की पूर्व प्रोफेसर डॉ. विमलताई थोरात ने कहा कि महिलाओं के लिए सावित्रीबाई फुले आदर्श हैं. महिलाओं को उनसे प्रेरणा लेनी चाहिए.

समारोह में डॉ. कुमुद पावड़े को क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले जीवन गौरव पुरस्कार से सम्मानित किया गया. समारोह की अध्यक्षता कॉलेज के प्राचार्य डॉ. यशवंत पाटिल ने की. इस अवसर पर संस्था के सचिव मोहन वासनिक प्रमुख अतिथि के रूप में उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा बागड़े ने किया. आभार डॉ. विमल राठोड़ ने माना. कार्यक्रम की प्रस्तावना डॉ. मनीषा नागपुरे ने रखी.

Apna Nagpur
Page No. 4 Jan 06, 2021
Powered by: erelego.com

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू .एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय
कामठी रोड नागपूर- 440026

# शिवस्वराज्य दिन समारोह


**रविवार, ६ जून २०२१**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाच्या स्मरणार्थ ६ जून हा शिवराज्याभिषेक दिन "शिवस्वराज्य दिन" म्हणून महाराष्ट्र सरकार साजरा करीत आहे व महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयाने तो आपल्या महाविद्यालयात साजरा करावा असे परिपत्रक महाविद्यालयाला आलेले आहे या अनुषंगाने **डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू .एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय** येथील **मराठी विभाग इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग** यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



## ऑनलाइन अतिथी व्याख्यान दिनांक - 6 जून 2021

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या दृष्टिकोनातून दिनांक 06 जून 2021 रोजी 'थोरलं राजं होऊन गेलं ' या विषयांतर्गत महाविद्यालयातील मराठी विभाग , इतिहास विभाग तसेच सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी सांगली येथील मा . रवींद्र दादा पाटील (अध्यक्ष -इतिहास प्रबोधन संस्था महाराष्ट्र ) यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र उलगडून दाखविले विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल अशा शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला .या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते एकूण **66** विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्यात आली. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये एकूण पाच प्राध्यापकांचा सहभाग होता त्यात इतिहास विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर



पाटील मराठी विभाग प्रमुख डॉ . मनीषा नागपुरे डॉ . महेंद्र गायकवाड प्रा . अमृता डोर्लीकर यांचा सहभाग होता ऑनलाइन पद्धतीने घेतलेल्या या सर्व कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग करण्यात आले. झूम व यु -ट्युब या दोन्ही प्लॅटफॉर्मवर हा कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे संचालन डॉ . मनीषा नागपुरे यांनी केले तर प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ . चंद्रशेखर पाटील यांनी केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर नरेंद्र बागडे होते कार्यक्रमाचा समारोप महेंद्र गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानून केला .

**उद्देश** १) विद्यार्थ्यांना इतिहासातील महापुरुषांचे जीवनचरित्र माहिती व्हावे.

२) विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वामुळे प्रेरणा निर्माण व्हावी .

३) शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी

## सांस्कृतिक विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळून पारितोषिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

### Online State Level Eassy Competition

**Subject –"Relevance of Dr.**

**Babasaheb Ambedkar's Thoughts on Democracy in the Present Context''**

**प्रथम पारितोषिक** - कु. साक्षी सरोदे ( श्री.ल. रा . तो वाणिज्य महा. अकोला) व श्री. अभिषेक पाटील ( म.वा पी.डब्ल्यू एस महा नागपूर)

**द्वितीय पारितोषिक** - कु. निकिता रामटेके ( वसंतराव नाईक शासकीय संस्था आणि कला वाणिज्य महा . नागपूर) व श्री सागर गांगुर्डे ( बी.पी. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स नागपूर) या विद्यार्थ्यांला मिळाले

**तृतीय पारितोषिक** - श्री प्रफुल गवई ( डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेज दिक्षाभूमी नागपूर) व कु . दर्शना सहारे ( मनोहरभाई पटेल वाणिज्य महा. आमगाव ता. देवरी)



विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित  राज्यस्तरीय व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची यादी

राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा दिनांक – **11 Jan 2020**   हर्ष  नागभीडे बी . ए . भाग -२

Annsaheb Gundewar college Nagpur11 Jan2020 संकेत मोटघरे बी. ए . भाग

राज्यस्तरीय निबंध स्पर्धा   दिनांक  -  06Dec2020  - अभिषेक पाटील बी. ए भाग -2